NATH GROUP

# नाथवार्ता

नाथ बायो-जीन्स (इं) लि. की त्रैमासिक गृहपत्रिका




## संपादकीय

### हम किसी से कम नही !

'नाथ वार्ता' गृहपत्रिकेचा हा 'फ्युजन बीटी विशेषांक' वाचकांच्या हाती देताना आम्हाला विशेष हर्ष होतो आहे. मे महिन्यात हा विशेषांक देण्यामागे काही एक ठोस कारण आहे. निमित्त आहे. त्याविषयी आमच्या वाचकांना माहिती देणे हा या संपादकीय टिपणाचा हेतू आहे!

नाथ बायो-जीन्स इंडिया लिमिटेडची एक महत्त्वाची ओळख म्हणजे बीटी कपाशी बियाणांच्या क्षेत्रात 'फ्युजन बीटी' हे तंत्रज्ञान भारतीय शेतकऱ्यांना देणारी कंपनी म्हणून नाथ सर्वत्र ओळखली जाते. हे तंत्रज्ञान इ. स. 2005-2006 मध्ये आम्ही भारतात आणताक्षणीच बीटी कपाशी बियाणाच्या किंमती - ज्या तेव्हा भरमसाठ होत्या, त्या खाली आल्या. कारण शेतकऱ्यांसाठी एक समर्थ पर्याय म्हणून 'फ्युजन बीटी' कपाशी बियाणे बाजारात आले. अनेक पर्याय उपलब्ध असले की कोणा एकाचीच असलेली मक्तेदारी संपुष्टात येते. तसेच हे घडलेले आहे. आरंभापासूनच 'फ्युजन बीटी' ने दोन शक्तीशाली जनुकांच्या प्रभावी गुणधर्मांचा संगम अर्थात 'फ्युजन' आपल्या तंत्रज्ञानात विकसित केलेले आहे हे आपण सर्व जाणताच.

तीन प्रकारच्या बोंडअळ्यांवर 'फ्युजन बीटी' यशस्वीपणे नियंत्रण करीत होतीच. परंतु त्याबरोबर लष्करी अळी...(स्पोडोप्टेरा लिटुरा) हिचा देखील बंदोबस्त करण्याची क्षमता 'फ्युजन बीटी' मध्ये आहे, याचा अनुभव देशातील हजारो शेतकऱ्यांना येत होता. त्यामुळे 'फ्युजन बीटी'स चारी बोंड अळ्यांचे नियंत्रण करणाऱ्या अन्य तंत्रज्ञानाच्या बियाणाएवढी किंमत निर्धारित केली जावी असे शेतकरी, वितरक व सर्वचजण म्हणत होते. 'फ्युजन बीटी' ची किंमत मात्र सरकारी आदेशामुळे शंभर रूपये कमी निर्धारित केल्या गेली होती.

निर्णय झालेला होता, त्यामुळे त्यावेळी त्याविषयी संघर्ष करण्याऐवजी अधिक शास्त्रीय पुरावा आणि चांचण्यांच्या अहवालासह आपले म्हणणे आपण सरकारी दरबारी मांडावे असे कंपनीने ठरविले होते. आमच्या प्रयत्नांना यंदा यश मिळाले आणि सर्वच कपाशी उत्पादक प्रमुख राज्यसरकारांना 'फ्युजन बीटी' सर्वाधिक किंमतीच्या बीटी बियाणांच्या गटात सहभागी करण्याचा निर्णय अखेरीस घ्यावा लागला.

प्रश्न किंमतीचा वा केवळ पैशांचा नाही. आम्हाला आनंद झालाय तो 'फ्युजन बीटी'स अखेर उचित स्थान आणि किंमत सरकारला द्यावी लागलेली आहे, याचा आहे. किंमत कमी म्हणजे दर्जा हलका असला पाहिजे अशी सर्वसाधारण ग्राहकाची समजूत होते. ते सहाजिकही आहे. परंतु, आता 'फ्युजन बीटी' सही उचित किंमत दिल्या गेल्याने दर्जाबाबत शंका घ्यायचे काही कारणच राहिलेले नाही. विविध राज्यसरकारांच्या या निर्णयाने आमचा हुरूप निश्चितच वाढला आहे. देशातील चार कृषिविद्यापीठांनी 'फ्युजन बीटी'च्या उच्च गुणवत्तेची आणि तिच्या लष्करी अळी नियंत्रण क्षमतेची भरपूर 'बायो एफिकसी' चांचण्या घेऊन, परिक्षण करून, ग्वाही दिलेलीच होती. किंमती बाबत फरक दूर करून आता विविध राज्यसरकारांनीही 'फ्युजनबीटी'च्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब केलेले आहे. आणि हेच हा विशेषांक काढण्यामागचे प्रमुख कारण आहे.


या निर्णयाचे बियाणे वितरक-विक्रेते, तसेच शेतकरी यांनी जे स्वागत केले आहे ते आमचा विश्वास आणि उत्साह वाढविणारेच आहे. काही निवडक विक्रेते व शेतकरी यांच्या याच अंकात दिलेल्या प्रतिक्रिया प्रतिनिधीक आहेत. बोलक्या आहेत. ज्या शेतकऱ्यांनी या ना त्या कारणामुळे आजवर 'फ्यजुन बीटी' कपाशी बियाणे लावले नव्हते, त्यांना ही माहिती निर्णय घेण्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरेल.

या संपादकीय टिपणास जे शिर्षक दिलेय 'हम किसी से कम नहीं' ते ही विचारपूर्वकच दिलेले आहे. त्यातून आम्हाला आमचा अहंकार व्यक्त करायचा नसून गुणवत्तेच्या संदर्भात आरंभापासूनच 'फ्युजन बीटी' कुठेही कमी नव्हती, नाही, हा मुख्य मुद्दा तेवढा अधोरेखित करायचा आहे. त्यासाठी आम्हाला संघर्ष करावा लागला, सबुरीने वागावे लागले हे सगळे खरे आहे. परंतु सबुरीची फळे नेहमीच गोड असतात याचा अनुभव आम्ही अवश्य घेतो आहोत.

कपाशी उत्पादक शेतकऱ्यांनी त्यांच्या यंदाच्या नियोजनात 'फ्युजन बीटी' कपशिबाणांचा अवश्य आणि भरोशाने समावेश करावा. त्यांना निराश व्हावे लागणार नाही. त्यांनाही अनुभव येईलच की, 'फ्यजुन बीटी' किसी से कम नही!

सर्व बियाणे विक्रते आणि शेतकरी बांधवांना खरिप 2011 हंगामासाठी अनंत शुभेच्छा!

**आपले स्नेहांकित,**
**नाथवार्ता फ्युजन बीटी विशेषांक टीम**



# वितरकांच्या प्रतिक्रिया



**श्री. मुकेशभाई राठी, ओम ट्रेडर्स**
**वखारिया कॉम्प्लेक्स, मंगलदास मार्केट, प्रमोद एजन्सीजच्या मागे, टिळक रोड, अकोला.**
**फोन नं. - दु. 2443895, 2458267**

मी गेल्या 4 वर्षांपासून नाथ बायो-जीन्सचे काम करीत असून माझ्याजवळ जवळपास 300 डीलर्सचे नेटवर्क आहे. तसेच माझ्या दुकानातून 300 ते 400 शेतकऱ्यांना मी दर वर्षी '**फ्युजन बीटी**' तंत्रज्ञानाचे वाण देत असतो. यामध्ये '**फ्युजन बीटी**' तंत्रज्ञानाचे वाण भरपूर उत्पादन देणारे असून यामध्ये तिनही प्रकारच्या अळयांचे तसेच स्पोडोप्टेरा (पाने खाणारी अळी) चे सुद्धा नियंत्रण होते. असे मनोगत माझे विक्रेते व असंख्य शेतकरी यांनी माझे जवळ व्यक्त केले.



**श्री. दिनेशभाई शहा, शाह एजन्सी**
**'प्रेम शांती' मानेक टॉकीजजवळ, टिळक रोड, अकोला.**
**फोन नं. - दु. 2434203, 2442739, 2441706**
**घर - 2437308**

मी चार वर्षांपासून नाथ बायो-जीन्स (इं) लि. औरंगाबाद या कंपनीचा वितरक आहे. या कंपनीचे '**फ्युजन टेक्नोलॉजी**' असलेले वाण विकतो. माझ्याकडे 200 ते 250 सब डीलर आहेत. त्यांच्या फिडबॅक व माझ्या सर्वेक्षणानुसार '**फ्युजन टेक्नोलॉजी**' चारही प्रकारच्या अळया मारणे, उंट अळी व लष्करी अळीसुद्धा मारणे त्यामुळे शेतकऱ्यांच्या एक दोन जास्त होणारे फवारणी खर्च वाचतात. व शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न येते.



**श्री.दिवाकर वैद्य, नवीन एजन्सीज, नांदेड.**

मी नाथ बायो-जीन्स (इं) लि. यांचा गेल्या वीस वर्षांपासून जिल्हा वितरक म्हणून काम करीत आहे. सतत नव-नवीन संशोधन शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत पोहचविणारी नाथ बायो-जीन्स ही एक भारतातील अग्रगण्य कंपनी आहे. या कंपनीने कपाशी व इतर बियाणे क्षेत्रामध्ये गेल्या तीन दशकात अनेक नव-नवीन संशोधित व संकरीत वाण दिलेले आहेत.

प्रामुख्याने सोमनाथ हे वाण शेतकऱ्यांत फारच लोकप्रिय होते. भारतातील शेतकऱ्यांना उच्च दर्जाचे कपाशी वाण देण्याकरीता नाथ बायोजीन्स (इं) लि. ने चीनसोबत कपाशी 'तंत्रज्ञानात' करार करून, कपाशीवरील सर्वांत मोठा शत्रू चारही प्रकारच्या बोंडअळयांना प्रतिकार शक्ती वाढवून किडीस व रोगास बळी न पडणारे '**फ्युजनबीटी**' हे तंत्रज्ञान विकसित केले.

या तंत्रावर आधारीत विकसित केलेली **एक्सप्रेस** व **अर्जुन-21** ही वाणे गेल्या दोन वर्षांपासून नांदेड व महाराष्ट्राच्या इतर भागात चांगली प्रचलित झाली आहेत. गतवर्षीच्या हंगामामध्ये जास्त पावसात सुद्धा या वाणांनी शेतकरी बंधूंना चांगले उत्पादन दिले. **एक्सप्रेस** व **अर्जुन-21** ही दोन्ही वाणे हलक्या व भारी जमीनीकरीता अत्यंत उपयुक्त आहेत.

यंदाच्या खरीप हंगामामध्ये कंपनीने **जगन्नाथ-2** हे वाण बाजारामध्ये उपलब्ध केले आहे. सदरील वाण शेतकऱ्यांमध्ये अत्यंत लवकर प्रचलित होईल याची मला हमखास खात्री आहे. कारण **जगन्नाथ-2** या वाणाची बोंडे मोठी व वजनदार आहेत. सरासरी बोंडाचे वजन 8.0 ग्रॅम पर्यंत भरते व पुर्नबहार क्षमता चांगली आहे. यंदाच्या खरीप हंगामामध्ये शेतकरी बंधूंनी नाथ बायो-जीन्सची **एक्सप्रेस**, **अर्जुन-21** व **जगन्नाथ-2** ही तीनही वाणे आपल्या शेतात लावून जास्तीत जास्त उत्पन्न घ्यावे.

खरीप हंगाम - 2011 निमित्त आमच्या सर्व विक्रेते व शेतकरी बंधूंना हार्दिक शुभेच्छा!



**श्री. विलासराव कदम, हिंदुस्थान ॲग्रो एजन्सी**
**मोंढा रोड, गेवराई . ता. गेवराई. जि. बीड**
**फोन नं. - (02447) 263224**

बीटी टेक्नोलॉजी आता भारतभर सर्व शेतकऱ्यांना अवगत झाली आहे. मला '**फ्युजन बीटी**' बद्दल सार्थ अभिमान आहे. कारण मी मागील 2 वर्षांपासून माझ्या सर्व शेतकरी बांधवाना **अर्जुन-21**, **एक्सप्रेस** व **जगन्नाथ-2** वाण देत आहे.

या तीनही वाणांबद्दल कष्टकरी व मेहनती शेतकरी अत्यंत खुशीत असून दिवसेंदिवस '**फ्युजन बीटी**'चे क्षेत्र वाढत आहे. त्याला कारण म्हणजे 100% चारही प्रकारच्या अळयांना बोंड अळयांना प्रतिबंध. आपणास व सर्व क्षेत्रातील सहकारी, संशोधन विभाग, संचालक व कंपनीस हार्दिक शुभेच्छा!



**श्री. अशोक काब्रा, राम ॲग्रो सेल्स**
**65, बी. जे. मार्केट, जळगाव.**
**फोन नं.- (0257) 2225138, 2220242.**
**फॅक्स - 2240738**
**ई-मेल** - ramagrojalgaon@indiatimes.com

मी राम ॲग्रो सेल्स, जळगांव सांगू इच्छितो की, मी नाथ बायोजीनचे मागील 10 वर्षांपासून काम करीत आहे. नाथ बायो-जीन्सची '**फ्युजन टेक्नोलॉजी**' शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. मी आपल्या कंपनीचे विविध प्रकारचे वाण 200 विक्रेत्यापर्यंत पोहचवण्याचे काम करतो तसेच जवळपास 1000 शेतकऱ्यांपर्यंत आपल्या कंपनीचे '**फ्युजन बीटी**' मध्ये असलेले **एक्सप्रेस बीटी** व **जगन्नाथ बीटीची** विक्री करतो.

मला विक्रेता व शेतकऱ्यांमार्फत नेहमीच '**फ्युजन टेक्नोलॉजी**'बद्दल अशी माहिती मिळते की, '**फ्युजन टेक्नोलॉजी**'मुळे चारही प्रकारच्या अळयांचे (हिरवी बोंडअळी, ठिपक्यांची बोंडअळी, गुलाबी बोंडअळी व तंबाखुच्या पाने खाणाऱ्या अळींचे अत्यंत उत्कृष्ट प्रकारचे नियंत्रण होते. त्याचप्रकारचे हे सर्व वाण लाल्या रोगास प्रतिकारक्षम आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात भरघोस वाढ होते.



# शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया



**सीताराम शामराव चव्हाण**
**सिंगोडा तांडा. ता. किनवट जि. नांदेड. मोबाईल नं. - 9423919984.**

अत्यंत खडकाळ जमीन, अगदी हल्की व दगड-धोंडे असलेली माझी जमीन आहे! ह्या जमिनीत उत्पादन घेणे मला दरवर्षी कठीण जायचं तरी आजपर्यंत येथे उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी यायचं. कारण पाण्याची सोय नाही व पाणी इतर दुसऱ्या शेताला देण्यासाठी वेळ खर्च करायचो म्हणून आजपर्यंत येथे उत्पादन मला फार कमी येत होतं. परंतु, नाथ बायो-जीन्सचे **अर्जुन-21** या वाणाने मला चमत्कार करून दाखवला. ह्या **अर्जुन-21** मध्ये जेथे उत्पन्न येत नाही तेथे उत्पन्न मिळवून देण्याची कुवत आहे! ह्या वाणाला पाण्याचा ताण सहन होतो. निकृष्ट व हलकी माळरान जमीनीतसुद्धा येवू शकतो. ह्याचे बोंड फार मोठे येतात व जवळ जवळ येतात. रोगाला बळी पडत नाहीत. लाल्या रोग शेवटपर्यंत ह्यावर आलेला नाही. कोरडवाहूमध्ये ह्याला बहारवर बहार येतात. वेचणीस सोपा जातो.



**नामदेव नारायण पेटकुले**
**पळशी, ता. किनवट, जि. नांदेड.**
**मोबाईल नं. - 07588522985**

मी नाथ बायो-जीन्स कंपनीचे **एक्सप्रेस** हे वाण 4 X 1 अंतरावर 1 एकरावर लागवड केले होते. सुरूवातीपासून ह्या वाणाचे झाड फार वाढत जाते. मला जास्त वाढ झाली असं वाटल्यानंतर मी शेवटी झाडाचा शेंडा तोडून घेतला. त्यामुळे त्याला जास्त फांद्या आल्या. ह्या वाणाची पाने ही शेवटपर्यंत हिरवीगार राहतात. इतर वाणांप्रमाणे झाडाची पाने लाल होत नाहीत. किंवा लाल्या हा येत नाही. रोगप्रतिकार शक्ती जास्त दिसून आली, रोगाला कमी बळी पडला. फवारणीवर जास्त खर्च करावा लागला नाही.



**सुभाष रजेसिंग गिरासे,**
**जावदा. ता. शहादा जि. नंदुरबार.**
**मोबाईल नं. - 9423494060**

मी माझ्या शेतात दि. 25/ 5/ 2010 रोजी 4.5 X 1.5 अंतरावर **एक्सप्रेस बीटी** वाणाची लागवड केली तरी मला या वाणापासून माझ्या अपेक्षेनुसार मला एकरी 18 क्विंटल उत्पन्न मिळाले. तरी ह्या वाणाला फवारणीचा खर्च कमी लागतो व वजनास इतर वाणापेक्षा सरस आहे व फरदडसाठी उत्तम आहे. **एक्सप्रेस बीटी** वरती कुठलीही अळी आढळून आली नाही.



**महेंद्र निंबा परदेशी**
**गल्ली नं. 5, पंचायती हवेलीजवळ**
**मु. पो. कुसुंबा. ता. जि. धुळे.**
**मोबाईल नं.- 9892092303**

**'फ्युजन बीटी'** कपाशी वाणांवर लाल्या पडत नाही. मावा तुडतुडे येत नाहीत, बोंडांचा आकार मोठा, व लष्करी अळीची प्रादुर्भाव दिसून आला नाही.



**हेमंतभाऊ वासुदेवराव गाढवे**
**माळीपुरा, मोर्शी**
**जि. अमरावती.**
**मोबाईल नं.-9673738447**

मी **'फ्युजन बीटी'** या वाणाचे उत्पादन गेल्या तीन वर्षांपासून घेत आहे. या तीन वर्षात मी केलेल्या निरीक्षणावरून असे आढळून आले की, या वाणावर चारही अळयांचा कसलाच प्रादुर्भाव होत नाही.



**पंजाबराव उत्तम आडे**
**बन्सी तांडा**
**ता. पुसद, जि. यवतमाळ.**

इतर वाणांपेक्षा **जगन्नाथ** हे वाण मला खूप चांगले वाटले. कारण वेचनी खूप सोपी आणि झाडाची उंचीसुद्धा चांगली आहे. व बोंडांची साईज सुद्धा खूप चांगली आहे. बोंड अळी व पाने खाणारी अळीचा **'फ्युजन बीटी'** द्वारे नियंत्रण करते. कोणत्याच प्रकारची अळी शेतात आढळली नाही.



**अशोक आनंदराव लेकुरवाळे**
**बन्सी तांडा. ता. पुसद**
**जि. यवतमाळ.**

**अर्जुन-21** हे वाण कोरडवाहूमध्ये खूप चांगले येणारे वाण आहे. कारण कमी पाण्यातसुद्धा जास्तीत जास्त उत्पादन देणारे वाण म्हणजे **अर्जुन-21** त्यामुळे मला **अर्जुन-21** हे वाण खूप चांगले वाटते. **'फ्युजन बीटी'** वर कोणत्याच प्रकारची अळी आढळून आलेली नाही.



**सचिन सुभाष पाटील**
**पळसखेडा. ता. भडगांव**
**जि. जळगांव.**
**मोबाईल नं. - 9730124222**

**एक्सप्रेस** हे वाण उभट वाढते. त्यामुळे ह्या वाणास भरपूर फलधारणा होते. लाल्या पडत नाही. खर्च कमी होतो ही या वाणाची वैशिष्ट्ये आहेत. मला या वाणावर कुठल्याच प्रकारची अळी दिसून आली नाही.



फ्युजन बीटी™
*एक परिपूर्ण तंत्रज्ञान...*



# शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया



**अशोक रामदास चौधरी**
**शिरपुर, जि. धुळे.**
**मोबाईल नं. - 8975555152**

**जगन्नाथ - 2** ह्या वाणाचा बोंडाचा आकार मोठा असून वजन 6 ते 6.5 ग्राम आहे. तसेच रोग प्रतिकारक वाण असून उत्पन्न जास्त देते. चारही अळयांचा प्रादुर्भाव दिसून आला नाही.



**विरभान हरचंद पाटील**
**गारखेडा, ता. एरंडोल जि. जळगांव.**
**मोबाईल नं. - 9823990667**

मी माझ्या भावाकडे मागील वर्षी **एक्सप्रेस** पाहिली होती व तेथे कंपनी प्रतिनीधी येत होते. मला कळले की, मार्केटमध्ये **जगन्नाथ-2** आले आहे. मी **जगन्नाथ-2** चे तीन पॅकेट 24 मे ला लावले. मला एकरी 15 ते 16 क्विंटल उत्पन्न मिळाले. मी पाहिले की, जी बोंड साईज खाली होती तीच शेंड्यावर सुद्धा होती. फवारणीचा खर्च कमी आला. तसेच कुठल्याही प्रकारची बोंडअळी आढळून आली नाही.



**शिवाजी बाजीराव पाटील**
**मु. चिंचखेडा, पो. केकत निंभोरा ता. जामनेर**
**जि. जळगांव. मोबाईल नं.- 9765002454**

मी दरवर्षी **एक्सप्रेस** या वाणाची लागवड करतो. **एक्सप्रेस** हे वाण माझ्या आवडीचे आहे. हे वाण इतर वाणांपेक्षा सरस आहे. या वाणाची वाढ जोमदार असून ह्याची बोंडे मोठी आहेत. या वाणामध्ये लष्करी बोंड अळीचे चांगल्याप्रकारे नियंत्रण होते.




## 'महाबीज' विकणार फ्युजन बीटी बियाणें



महाबीज आणि नाथ कंपनीतील कराराची प्रत आणि फ्युजन बीटी एक्सप्रेस व अर्जुन-21 या वाणांची पाकिटे दाखवताना महाबीजचे विपणन महाव्यवस्थापक संजय खताळ आणि नाथ बायो-जीन्सचे वरिष्ठ महाव्यवस्थापक संतोष जोशी दिसत आहेत. छायाचित्रात महाबीजचे विभागीय व्यवस्थापक सर्वश्री वलाले, देशमुख, गवळी यांच्यासह नाथचे विपणन महाव्यवस्थापक रामचंद्र नाके, सुधीर सेवेकर आणि डॉ. श्याम परदेशी हे ही दिसत आहेत.

यंदाच्या खरीप हंगामात महाराष्ट्र राज्य बियाणें महामंडळ (महाबीज), फ्युजन बीटी एक्सप्रेस आणि फ्युजन बीटी अर्जुन-21 या दोन कपाशी बियाणांची विक्री करणार आहे. महाबीज आणि फ्युजनबीटी कपाशी बियाणांचे उत्पादक नाथ बायो-जीन्स इंडिया लिमिटेड या दोन कंपन्यांमध्ये तशा आशयाचा एक करार नुकताच करण्यात आला आहे. "महाबीज विविध पीकांचे बियाणे विकते. सुमारे चारशे कोटींची उलाढाल करते. परंतु, कपाशीचे चांगले बियाणें मात्र आमच्याजवळ नव्हते. ती कमतरता या करारामुळे आणि फ्युजन बीटी कपाशी बियाणांमुळे आता दूर झाली आहे!" असे उद्‌गार 'महाबीज'चे विपणन महाव्यवस्थापक श्री. संजय खताळ यांनी काढले आहेत. ते पुढे म्हणाले की, "बाजारात आज बीटी बियाणांचे शेकडो ब्रॅण्डस् उपलब्ध आहेत. त्या सर्वांच्या कामगिरीवर आमचे लक्ष होतेच. अभ्यासाअंती फ्युजनबीटी कपाशी बियाणें महाराष्ट्राच्या कृषिपरिस्थितीसाठी सुयोग्य असल्याचे आमच्या लक्षात आले आणि आम्ही नाथ बायो-जीन्स कंपनीशी संपर्क साधला. कंपनीचे विपणन महाव्यवस्थापक रामचंद्र नाके या मंडळींनी आम्हाला खूप सकारात्मक प्रतिसाद दिला आणि त्यातून महाबीज व नाथ बायो-जीन्स या कंपन्यांमध्ये करार घडून आला आहे. त्यानुसार यंदाच्या हंगामात आम्ही **एक्सप्रेस** व **अर्जुन-21** हे दोन वाण विकणार आहोत."

औरंगाबाद येथे अलिकडेच संपन्न झालेल्या एका कार्यक्रमात दुधड येथील प्रगतीशील शेतकरी श्री. चौधरी यांना फ्युजनबीटी महाबीज 'एक्सप्रेस' वाणाचे पहिले पाकीट प्रातिनिधिक रूपात विकण्यात येऊन यंदाच्या हंगामाचा विक्रीशुभारंभ महाबीज व नाथ या उभय कंपन्यांनी केला. याप्रसंगी महाबीजचे विभागीय व्यवस्थापक सर्वश्री वलाले, देशमुख, गवळी यांच्यासह नाथ बायो-जीन्सचे श्री. संतोष जोशी, रामचंद्र नाके, सुधीर सेवेकर, डॉ. श्याम परदेशी इत्यादी मंडळी उपस्थित होती.

महाबीजने पुढील हंगामासाठीच्या फ्युजनबीटी कपाशी बियाणांची आमच्याकडे नोंदणी केली आहे, त्याबद्दलचे समाधान नाथचे वरिष्ठ महाव्यवस्थापक श्री. संतोष जोशी यांनी व्यक्त केले. तर महाबीज आणि नाथ यांची ही हातमिळवणी महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांकरिता हिताची ठरणारी आहे, अशी ग्वाही श्री. रामचंद्र नाके यांनी याप्रसंगी दिली. एक पर्यायी आणि सुयोग्य तंत्रज्ञान म्हणून चार कृषिविद्यापीठांसह अनेक राज्य सरकारांनी फ्युजन बीटीस मान्यता दिलेली आहे. कोरडवाहूसाठी **अर्जुन-21** आणि बागायतीसाठी **एक्सप्रेस** वाणांच्या लागवडीतून शेतकऱ्यांना निश्चित समाधानकारक उत्पन्न मिळेल, असे डॉ. श्याम परदेशी यांनी याप्रसंगी सांगितले. दोन्ही वाणांच्या गुणवैशिष्ट्यांचीही माहिती त्यांनी विस्ताराने दिली.

'नाथवार्ता'
नाथ बायो-जीन्स (इं) लि.की त्रैमासिक गृहपत्रिका
निःशुल्क निजी वितरण के लिए
हिंदी तथा अंग्रेजी भाषा में प्रकाशित

● नाथवार्ता टीम
**प्रबंध संचालक**
श्री. सतीश कागलीवाल
**प्रकाशक**
श्री. संतोष जोशी
**डिझाईन-सजावट**
श्री. शिवशंकर फाळके
**संपादकीय समन्वय**
श्री. सुधीर सेवेकर

पत्राचार एवं संपर्क के लिए पता -
'नाथवार्ता' द्वारा नाथ बायो-जीन्स(इं)लि.
नाथ रोड, नाथ हाऊस, औरंगाबाद-431 001.
फोनः 0240-2376313 से 17,
फॅक्सः 0240-2376188
ईमेलः falke@nathseeds.com